महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल नियम १९६१) नुसार शासकिय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची व्याख्या. आदेशांचे एकत्रिकरण.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक एमएजी १०९९/ प्र.क्र. २२०/आ.३ :
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ ऑगस्ट १९९९.

शासन निर्णय :-

शासन निर्णय क्रमांक एमएजी-१०६२/ ५८०७४/ पी, दिनांक ८,जानेवारी,१९६९, (२) क्रमांक एमएजी-१०६५/ ८४५३४/ पी, दिनांक ९ एप्रिल, ६९, (३) क्रमांक एमएजी-१०६९/ ६५०२३/पी, दिनांक २१,डिसेंबर,१९७०,(४)क्रमांक एमएजी-११७०/ २५/ ७१४/ पी, दिनांक २२ नोव्हेंबर,१९७२ (५) क्रमांक एमएजी-१२७३/ एमएडी-६, दिनांक २७ सप्टेंबर,१९७३ (६) क्रमांक एमएजी-१२७३/ ६१३७३-६, दिनांक २७ सप्टेंबर,१९७५ (७) क्रमांक एमएजी-१०७६/ १०७/पीएच-९, दिनांक ३० ऑक्टोबर,१९७६, (८) क्रमांक एमएजी-१०९२/ ६३४/ सीआर ६५/आ-७, दिनांक २१ ऑगस्ट,१९९२ हे सर्व आदेश रद्द करण्यात येत असून या सर्व आदेशांचे एकत्रिकरण करुन पुढीलप्रमाणे नविन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

कुटुंब म्हणजे - १) शासकीय कर्मचारी /अधिकारी यांची पत्नी किंवा पती :-

शासकीय कर्मचारी /अधिकारी यांवर अवलंबून असतील अशी औरस मुले, सावत्र मुले, कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

२) शासकीय कर्मचारी /अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेली शासकीय कर्मचारी /अधिकारी यांचे आई-वडील, महिला शासकीय कर्मचाऱ्यास तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेले तिचे आई-वडीलांची किंवा सासुसासऱ्यांपैकी एकाची निवड करता येईल.

३) शासकीय कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वया खालील अविवाहित भाऊ .

४) शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहित बहिणी व घटस्फोटीत बहिणी, त्यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेवू नये.

५) या नियमाखाली प्रतिपूर्ती करण्यासाठी अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेले शासकीय कर्मचारी /अधिकारी यांची मूले आणि अविवाहित मूली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. शासकीय कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मूळ निवृत्तीवेतन रुपये ५००/- पर्यंत आहे, असे आईवडील तसेच घटस्फोटीत बहिण हे शासकीय कर्मचाऱ्यावर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

एच-642(सी)(3500-8-99)-1

GR-200 2062815483 4000-1900

६) राज्य शासन, रेल्वे, संरक्षण, शासनाच्या मालकीची संघटना, अगर खाजगी संघटना मध्ये काम करीत असणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांची पती किंवा पत्नी यांना जर वैद्यकीय भत्ता मिळत असेल तर त्याला महाराष्ट्र राज्यसेवा (वैद्यकीय देखभाल)) नियम १९६१ अन्वये सवलतीचा लाभ घेण्याचे किंवा संघटनेने (संस्थेने) ठरविलेल्या सवलतीचा लाभ यापैकी कोणताही एक पर्याय घेण्याचा यापैकी एक निवडण्याचा हक्क असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(एल.जी.इप्पेवार)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति,
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, (सर्व मंत्रालयीन विभाग),मंत्रालय, मुंबई.
सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई (दोन प्रती)
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (५ प्रती)
- सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन , मुंबई (१० प्रती)
- सेंटलमेंट कमिशनर अॅण्ड डायरेक्टर ऑफ लॅंड रेकॉर्डस्, पुणे (२ प्रती)

विभागीय आयुक्त (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)
जिल्हाधिकारी (सर्व) (प्रत्येकी २ प्रती)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा)मुंबई (२ प्रती)
महालेखापाल, महाराष्ट्र-२,(लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा)नागपूर (२ प्रती)
सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रतींद)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (१० प्रती)
चिफ ऑडीटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई (१० प्रती)
कोषागार अधिकारी (सर्व) (प्रत्येकी ५ प्रती)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई (५० प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई (५० प्रती)
संचालक, आयुर्वेद, मुंबई (२५ प्रती)

एच-642(सी)(3500-8-99)-Iअ